Total No. of Questions : 5]

SEAT No. :

**P2784**

[Total No. of Pages : 2

**[4702]Ext. - 12**

**M.A. (Part - I) External**

# MARATHI (मराठी)

# Abhyaspatrika Kramank - 2

# अभ्यासपत्रिका क्र. – 2

# Madhyayugin Marathi Vangmayacha Etihas

# मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास

# (प्रारंभ ते इ.स. 1818)

**(2013 Pattern)**

वेळ : 3 तास]

[एकूण गुण : 100

सूचना :

1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

---

*प्रश्न 1)* मराठी भाषेचा उगम व विकास यावर उपलब्ध पुराव्यांच्या आधारे प्रकाश टाका.

किंवा

आद्यकवी मुकुंदराजांच्या ग्रंथकर्तृत्वाचे वाङ्मयीन विशेष स्पष्ट करा.

*प्रश्न 2)* संत ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा परामर्श घ्या.

किंवा

संत साहित्याच्या प्रेरणा व प्रवृत्तींचे साधार विवेचन करा.

*प्रश्न 3)* संत तुकारामांच्या अभंगवाणीचे विशेष सोदाहरण स्पष्ट करा.

किंवा

पंडिती काव्याचे मराठी वाङ्मयपरंपरेतील महत्व विशद करा.

*प्रश्न 4)* ‘बखर’ या शब्दाच्या विविध उपपत्ती सांगून या वाङ्मयप्रकाराचे स्वरूप स्पष्ट करा.

किंवा

शाहिरी वाङ्मयाच्या प्रेरणा व प्रवृत्ती ससंदर्भ स्पष्ट करा.

***प्रश्न 5)*** टिपा लिहा. (कोणत्याही दोन)

अ) मराठी संत कवयित्री

ब) मराठी जैन साहित्य

क) संत एकनाथांची भारूडे

ड) शिवचरित्रात्मक बखरी

⊖⊖⊖

Total No. of Questions : 5]

SEAT No. :

**P2785**

[Total No. of Pages : 2

**[4702]Ext. - 13**

**M.A. (Part - I) (External)**

# मराठी (MARATHI)

# Abhyaspatrica Kramank - 3

# अभ्यासपत्रिका क्र. 3

## Bhashyavidnyan : Varnanatmak Va Samajik

## भाषाविज्ञान : वर्णनात्मक व सामाजिक

**(2013 Pattern)**

वेळ : 3 तास]

[एकूण गुण : 100

सूचना :

1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

---

*प्रश्न 1)* 'सामाजिक भाषाविज्ञाना' ची संकल्पना स्पष्ट करून भाषाभ्यासाच्या दृष्टीने या संकल्पनेचे महत्व स्पष्ट करा.

किंवा

विनिमयाच्या इतर साधनांपेक्षा भाषा हे उपयुक्त व परिणामकारक साधन कसे आहे ते सांगा.

*प्रश्न 2)* रूपिका – रुपिम – रूपिकांतर या संकल्पना स्पष्ट करून त्यातील परस्पर संबंधांचे विश्लेषण करा.

किंवा

अर्थाच्या विविध व्याख्या सांगून अर्थविन्यासाचे स्वरूप स्पष्ट करा.

*प्रश्न 3)* भाषा,बोली आणि समाज यांचे परस्परसंबंध स्पष्ट करा.

किंवा

व्यक्तीच्या समाजी करणात भाषेचा सहभाग विविध व्यवसायक्षेत्रांच्या संदर्भात स्पष्ट करा.

*प्रश्न 4)* प्रमाणभाषा म्हणजे काय हे सांगून भाषासंपर्काचे स्वरूप विशद करा.

किंवा

संपर्कभाषा निर्मितीची प्रक्रिया स्पष्ट करून मराठी ही कशी क्रिऑल (Creol) भाषा आहे ते स्पष्ट करा.

*P.T.O.*

***प्रश्न 5)*** टीपा लिहा. (कोणत्याही दोन)

अ) खंडयुक्त स्वनिम

ब) रुपिमांचे प्रकार

क) भाषिक कोश

ड) व्यावसायिकांची बोली

⊖⊖⊖

Total No. of Questions : 5]

SEAT No. :

**P2786**

[Total No. of Pages : 8

# [4702]Ext.-14

## M. A. (Part - I) (External)

## MARATHI (मराठी)

## अभ्यासपत्रिका क्र.- 4 (ऐच्छिक)

## (2013 Pattern)

विशेष सूचना:– खालील पाच अभ्यासपत्रिकांपैकी कोणतीही एक प्रश्नपत्रिका सोडवावी.

1) ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य

किंवा

2) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (प्रारंभ ते 1960)

किंवा

3) तौलनिक साहित्याभ्यास व भाषांतरमीमांसा

किंवा

4) वाङ् मयेतिहासलेखनविद्या

किंवा

5) अलंकार, छंद आणि व्याकरण

---

**1) ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य**

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 100*

*सूचना :– 1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.*

*2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* ग्रामीण साहित्याचे विशेष उलगडून दाखवा.

किंवा

प्रादेशिक साहित्याची संकल्पना सोदाहरण स्पष्ट करा.

*प्रश्न 2)* 'ग्रामीण साहित्याने बदलत्या वास्तवाचे चित्रण अंगिकारले' या विधानाची चर्चा करा.

किंवा

ग्रामीण साहित्य समीक्षेचा आढावा घ्या.

*P.T.O.*

*प्रश्न 3)* ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेशी दलित साहित्याची नाळ घट्टपणे जोडली गेलेली आहे’ हे विधान ससंदर्भ स्पष्ट करा.

किंवा

दलित साहित्यांचे वेगळे सौंदर्यशास्त्र असावे का? साधकबाधक चर्चा करा.

*प्रश्न 4)* दलित कवितेची वाटचाल स्पष्ट करा.

किंवा

‘दलित साहित्य हे चळवळीतून जन्मलेले साहित्य आहे’ या विधानाचा परामर्श घ्या.

*प्रश्न 5)* टीपा लिहा. (कोणत्याही दोन)

अ) ग्रामीण साहित्याची भाषाशैली

ब) बारा बलूतेदार व कृषिजीवन

क) दलित साहित्यसंमेलने

ड) ‘अस्मितादर्श’ चे कार्य

**Total No. of Questions : 5]**

**P2786**

# [4702]Ext.-14
# M. A. (Part - I) (External)
## MARATHI (मराठी)
## अभ्यासपत्रिका क्र.- 4 (ऐच्छिक)
## (2013 Pattern)
### 2) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (प्रारंभ ते 1960)

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 100*

*सूचना :– 1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.*
*2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* साहित्याचा सांस्कृतिक अन्वय संदर्भासह स्पष्ट करा.

किंवा

यादवकालीन साहित्यनिर्मिती मागील प्रेरणा स्पष्ट करा.

*प्रश्न 2)* वैचारिक प्रबोधनातून निर्माण झालेल्या साहित्याचा मागोवा घ्या.

किंवा

महात्मा फुले यांच्या सुधारणावादी साहित्याचा परामर्श घ्या.

*प्रश्न 3)* अर्वाचीन मराठी साहित्याच्या प्रेरणा सोदाहरण स्पष्ट करा.

किंवा

स्वातंत्र्यविषयक चळवळी आणि साहित्य यांचा अनुबंध उलगडून दाखवा.

*प्रश्न 4)* लोकसंस्कृती आणि आधुनिक मराठी साहित्य यांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

किंवा

अभिरूची नियंत्रित करणारे घटक कोणते? ते लिहा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) वारकरी कीर्तन

ब) तुका आकाशाएवढा

क) साहित्यप्रचाराची अर्वाचीन साधने

ड) पोवाडा

Total No. of Questions : 5]

**P2786**

# [4702]Ext.-14
# M. A. (Part - I) (External)
# MARATHI (मराठी)
# अभ्यासपत्रिका क्र.- 4 (ऐच्छिक)
# (2013 Pattern)
## 3) तौलनिक साहित्याभ्यास आणि भाषांतरमीमांसा

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 100*

*सूचना :– 1) सर्व प्रश्न आवश्यक आहे.*
*2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* तौलनिक साहित्याभ्यासाची संकल्पना स्पष्ट करा.

किंवा

तौलनिक साहित्याभ्यासाची तत्वे विशद करा.

*प्रश्न 2)* तौलनिक साहित्याभ्यासामुळे वाङ्मयविषयक व संस्कृतीविषयक जाणिवा प्रगल्भ होतात.'' या विधानाची चर्चा करा.

किंवा

'कृष्णाकाठ' व 'अत:स्थ' या दोन साहित्यकृतीतील राजकीय जीवनाची तुलना करा.

*प्रश्न 3)* भाषांतर म्हणजे काय? भाषांतराचे स्वरूप स्पष्ट करा.

किंवा

अभिजात साहित्यकृतीचे निकष सविस्तर लिहा.

*प्रश्न 4)* मराठी भाषेतून इतर भाषेत भाषांतरीत झालेल्या साहित्यकृतींचा उहापोह करा.

किंवा

विजय तेंडुलकर यांच्या 'घाशीराम कोतवाल' या नाटकाची मध्यवर्ती कल्पना स्पष्ट करा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) विश्वसाहित्याची संकल्पना

ब) यशवंतराव चव्हाण यांची राजकीय कारकीर्द

क) भाषांतर प्रक्रियेचे स्वरूप

ड) 'घाशीराम कोतवाल' या नाटकातील संवाद

❀ ❀ ❀

Total No. of Questions : 5]

**P2786**

# [4702]Ext.-14

## M. A. (Part - I) (External)

## MARATHI (मराठी)

## अभ्यासपत्रिका क्र.- 4 (ऐच्छिक)

## (2013 Pattern)

### 4) वाङ्मयेतिहासलेखनविधा

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 100*

*सूचना :– 1) सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*

*2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* इतिहासलेखन व वाङ्मयेतिहासलेखन यांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

किंवा

''वाङ्मयेतिहासलेखन म्हणजे वाङ्मयाभ्यासाचे स्वतंत्र अभ्यासक्षेत्र आहे'' या विधानाची चर्चा करा.

*प्रश्न 2)* पाश्चात्य विचारवंतांनी मांडलेल्या वाङ्मयेतिहासविषयक संकल्पनांचा परिचय करून द्या.

किंवा

भारतीय विचारवंतांनी मांडलेल्या वाङ्मयविषयक संकल्पनांचा परिचय करून द्या.

*प्रश्न 3)* आधुनिक मराठी वाङ्मयेतिहास लेखनातील समस्यांचा उहापोह करा.

किंवा

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वाङ्मयेतिहास प्रकल्यांचा आढाव घ्या.

*प्रश्न 4)* ल.रा. नासिराबादकर व कुसुमावती देशपांडे यांच्या वाङ्मयेतिहासलेखनाच्या कार्याचा परिचय करून घ्या.

किंवा

मराठीतील वाङ्मयेतिहास लेखनाची वाटचाल स्पष्ट करा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) समग्रलक्षी वाङ्मयेतिहास

ब) वाङ्मयीन घटना

क) वि.ल. भावे यांचा वाङ्मयेतिहास

ड) वाङ्मयेतिहासातील माटे – बेडेकर वाद

❀ ❀ ❀

Total No. of Questions : 5]

**P2786**

# [4702]Ext.-14

## M. A. (Part - I) (External)

## MARATHI (मराठी)

## अभ्यासपत्रिका क्र.- 4 (ऐच्छिक)

## (2013 Pattern)

## 5) अलंकार, छंद आणि व्याकरण

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 100*

*सूचना :– 1) सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*

*2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* अलंकार म्हणजे काय? अर्थालंकारांचे प्रकार सोदाहरण लिहा.

किंवा

शब्दालंकार म्हणजे काय? शब्दालंकारांचे प्रकार सोदाहरण लिहा.

*प्रश्न 2)* मराठी छंदांची संस्कृतमधील पूर्वपीठीका संदर्भासह लिहा.

किंवा

छंदाचे काव्यरचनेतील स्थान विशद करा.

*प्रश्न 3)* व्याकरण म्हणजे काय? व्याकरणप्रक्रियेचा परिचय करून द्या.

किंवा

लावणी आणि पोवाडा या पद्यप्रकारांची थोडक्यात ओळख करून द्या.

*प्रश्न 4)* मराठी व्याकरणकारांचे योगदान स्पष्ट करा.

किंवा

शब्दांच्या जाती कोणत्या ? विश्लेषण करा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोन टिपा लिहा.

अ) समास

ब) व्याकरणाची गरज

क) अलंकारमंजुषा

ड) वचनविचार

Total No. of Questions : 5]

SEAT No. :

**P3359**

[Total No. of Pages : 2

**[4702]Ext.-15**

**M.A. (Part - II) (External)**

# MARATHI (मराठी)

## अभ्यासप्रत्रिका क्र. – 5

## प्रसार माध्यमे आणि साहित्यव्यवहार

**(2013 Pattern)**

वेळ : 3 तास]

[एकूण गुण : 100

सूचना :

1) सर्व प्रश्न आवश्यक आहेत.

2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

---

*प्रश्न 1)* मुद्रित माध्यमातील भाषेचे स्वरूप सोदाहरण स्पष्ट करा.

किंवा

तुम्हाला आवडलेल्या नाटकावर आस्वादात्मक लेखन करा.

*प्रश्न 2)* आकाशवाणीवरील कार्यक्रमातील संगीत व संवादलेखनाची वैशिष्ट्ये विशद करा.

किंवा

दृक् श्राव्य माध्यमातील संहितेचे लेखन करताना कोणकोणत्या गोष्टी विचारात घ्याव्या लागतात.

*प्रश्न 3)* वृत्तसंकलन म्हणजे काय ते सांगून कृषिविषयक कार्यक्रमाच्या वृत्तसंकलनाचा आराखडा तयार करा.

किंवा

वृत्तपत्रातील जाहिरातींचे स्वरूप व वैशिष्ट्ये सोदाहरण लिहा.

*प्रश्न 4)* 'चित्रपट ही दृश्यांची भाषा असते' या विधानाचा परामर्श घ्या.

किंवा

पटकथालेखनाचे स्वरूप स्पष्ट करा.

***प्रश्न 5)*** **कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.**

**अ) क्रिडापत्रकारिता**

**ब) संगीताचा आस्वाद**

**क) चित्र प्रदर्शन**

**ड) नाटक : प्रभावी दृकश्राव्य माध्यम**

⊖⊖⊖

**Total No. of Questions : 5]**

**SEAT No. :**

**P3360**

**[Total No. of Pages : 2**

# [4702] Ext. - 16

## M.A. (Part - II) (External)

## MARATHI

## अभ्यासपत्रिका क्र. 6

## (साहित्य – समीक्षा व संशोधन)

## (2013 Pattern)

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 100*

***सूचना : 1) सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहेत.***

***2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.***

---

*प्रश्न 1)* समीक्षेची संकल्पना, स्वरूप, वैशिष्ट्ये व प्रयोजन स्पष्ट करा.

किंवा

आदर्श समीक्षकाने कोणती पथ्ये पाळली पाहिजे.

*प्रश्न 2)* समीक्षेच्या विविध पध्दती सांगून तुम्हाला महत्वाची वाटणारी समीक्षा पध्दती सोदाहरण स्पष्ट करा.

किंवा

1921 ते 1945 हा कलावादी प्रवृत्तींच्या प्रभावाचा कालखंड होता हे उदाहरणासह लिहा.

*प्रश्न 3)* संशोधनाची संकल्पना, प्रेरणा व प्रयोजने तुमच्या शब्दात लिहा.

किंवा

लोकसाहित्य व लोक संस्कृती यांचा अनुबंध उलगडून दखवा.

*प्रश्न 4)* साहित्याच्या अभ्यासासाठी समाजशास्त्राच्या आकलनाची आवश्यकता स्पष्ट करा.

किंवा

लोक साहित्याच्या संशोधनाचा आढावा घ्या.

*प्रश्न 5)* टीपा लिहा. (चार पैकी दोन)

अ) समीक्षकाचा टीका विवेक

ब) साहित्य आणि तत्वज्ञान

क) रसिकतेची आवश्यकता

ड) संशोधन प्रक्रियेतील साधन – पुस्तके.

Total No. of Questions : 5]

SEAT No. :

**P3358**

[Total No. of Pages : 4

**[4702]Ext.-17**

**M.A. (Part - II) (External)**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासप्रत्रिका क्र. – 7**

**विशेष लेखकाचा अभ्यास (मध्ययुगीन/अर्वाचीन)**

**मध्ययुगीन : संत जनाबाई**

वेळ : 3 तास]

[एकूण गुण : 100

**सूचना :**

*1)* **सर्व प्रश्न आवश्यक आहेत.**

*2)* **सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.**

---

*प्रश्न 1)* मध्ययुगीन कालखंडातील सामाजिक व धार्मिक पर्यावरणाचा आढावा घ्या.

किंवा

संत जनाबाईची वाङ्मयीन जडणघडण स्पष्ट करा.

*प्रश्न 2)* संत जनाबाईच्या 'हरिश्चंद्राख्यान व कृष्णजन्म या वाङ्मयकृती स्पष्ट करा.

किंवा

संत जनाबाईच्या अभंगातील वैविध्य सविस्तर स्पष्ट करा.

*प्रश्न 3)* संत जनाबाईच्या विठ्ठल महात्म्यपर अभंगाचे स्वरूप स्पष्ट करा.

किंवा

संत जनाबाईच्या नामदेव चरित्रपर अभंगाची चर्चा करा.

*प्रश्न 4)* संत जनाबाईची जीवननिष्ठा अभंगातून कशी स्पष्ट होते ते सांगा.

किंवा

संत जनाबाईच्या अभंगाची भाषाशैली विशद करा.

*P.T.O.*

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) वारकरी संप्रदायाचा आचारधर्म

ब) संत कवयित्री – सोयराबाई व कान्होपात्रा

क) संत जनाबाई – आरती आणि ओव्या

ड) 'देव खाते, ...... देव पिते' ..... स्पष्ट करा.

⊖⊖⊖

Total No. of Questions : 5]

**P3358**

**[4702]Ext.-17**

**M.A. (Part - II) (External)**

MARATHI **(मराठी)**

**अभ्यासप्रत्रिका क्र. – 7**

**विशेष लेखकाचा अभ्यास (मध्ययुगीन/अर्वाचीन)**

**यशवंतराव चव्हाण**

वेळ : 3 तास] [एकूण गुण : 100

**सूचना :**

1) **सर्व प्रश्न आवश्यक आहेत.**

2) **सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.**

---

*प्रश्न 1)* यशवंतराव चव्हाण यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण स्पष्ट करा.

किंवा

'कृष्णकाठ' – च्या आधारे यशवंतराव चव्हाण यांच्या आत्मचरित्राची वैशिष्ट्ये लिहा.

*प्रश्न 2)* यशवंतरावांच्या भाषणातून स्पष्ट होणारी पुरोगामी भूमिका स्पष्ट करा.

किंवा

यशवंतरावांच्या पत्रसंग्रहाच्या आधारे ललितगद्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

*प्रश्न 3)* 'यशवंतरावांच्या सामाजिक विचारांच्या आधारे महाराष्ट्राची जडणघडण झाली' – स्पष्ट करा.

किंवा

यशवंतरावांचे साहित्यविषयक विचार आजही महत्वाचे ठरतात – कसे ते सांगा.

*प्रश्न 4)* राजकीय विचारंवत म्हणून यशवंतरावांच्या लेखनाची वैशिष्ट्ये सांगा.

किंवा

यशवंतरावांचे महाराष्ट्राला लाभलेले शैक्षणिक योगदान उलगडून दाखवा.

***प्रश्न 5)*** **कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.**

अ) **यशवंतरावांचे प्रवासवर्णन**

ब) **यशवंतरावांचे ऋणानुबंध**

क) **यशवंतरावांचे त्रिभाषा सूत्र**

ड) **यशवंतरावांच्या आईचे व्यक्तिचित्र**

⊖⊖⊖

Total No. of Questions : 5]

SEAT No. :

**P3357**

[Total No. of Pages : 7

**[4702] - Ext.-18**

**M.A. (Part - II) (External)**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 8 (ऐच्छिक)**

**(2013 Pattern)**

खालील पाच अभ्यासपत्रिकांपैकी कोणतीही एक प्रश्नपत्रिका सोडवावी.

1) सौंदर्यशास्त्र.
2) लोकसाहित्याची मुलतत्वे आणि मराठी लोकसाहित्य.
3) लेखनविद्या आणि निबंधलेखन.
4) मराठीतील वैचारिक साहित्य आणि साहित्याचा सामाजिक-दृष्टिने अभ्यास.
5) साहित्य : सर्जन आणि उपयोजन.

---

# 1) सौंदर्यशास्त्र

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 100*

*सूचना :*

1) *सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*
2) *सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* सौंदर्यशास्त्राचे स्वरूप व कार्य विशद करा.

किंवा

सौंदर्यवाचक विधानांचे स्वरूप स्पष्ट करून द्विधृवात्मकतेची संकल्पना स्पष्ट करा.

*प्रश्न 2)* सौंदर्यसिद्धान्तांचे स्वरूप स्पष्ट करून भावनानिष्ठतेचा सिद्धान्त लिहा.

किंवा

सौंदर्यानुभवाच्या वैशिष्ट्यांचा परिचय करून द्या.

*प्रश्न 3)* मानवी मनातील एक भावना म्हणून सौंदर्यभावनेचे स्वरूप स्पष्ट करा.

किंवा

क्लाईव्ह बेलच्या 'अर्थपूर्ण रूपा' (significant form)च्या सिद्धान्ताचे विवरण करा.

*प्रश्न 4)* भावना विरेचन सिद्धान्ताचा (Catharsis) परिचय करून द्या.

किंवा

सौंदर्यशास्त्र आणि साहित्यविचार यातील अनुबंध स्पष्ट करा.

*P.T.O.*

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) निसर्गातील सौंदर्य व निसर्गाबाहेरील सौंदर्य

ब) सौंदर्य अनुभवातील विश्वात्मकता

क) टॉलस्टॉयचा भावनासंक्रमण सिद्धान्त

ड) सौंदर्यशास्त्र आणि समीक्षा

# 2) लोकसाहित्याची मूलतत्वे आणि मराठी लोकसाहित्य

*वेळ : 3तास]* *[एकूण गुण : 100*

*सूचना :*

1) *सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*

2) *सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* लोकसाहित्याचे स्वरूप स्पष्ट करा.

किंवा

लोकसाहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक जीवनाशी असलेले अनुबंध विशद करा.

*प्रश्न 2)* लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या विविध अंगांचा सविस्तर परिचय करून द्या.

किंवा

लोकसाहित्य आणि लोकजीवनाची विविध क्षेत्रे यांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

*प्रश्न 3)* लोकसाहित्यामध्ये स्त्रीजीवनाचे चित्रण कसे केले जाते याचा परिचय करून द्या.

किंवा

मराठी लोकगीतांची वैशिष्ट्ये लिहा.

किंवा

व्रतकथांचे स्वरूप व प्रेरणा विशद करा.

*प्रश्न 4)* लोकसाहित्य आणि लोककला यांच्यातील अनुबंध स्पष्ट करा.

किंवा

लोकसाहित्याच्या सादरीकरणातील विविधता विशद करा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) लोकसाहित्याचे संकलन

ब) लोकसाहित्याचे संशोधन

क) तमाशा : एक लोककला

ड) लोकसाहित्याची भाषा

# 3) लेखनविद्या व निबंधलेखन

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 100*

*सूचना :*

1) *सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.*
2) *सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* संवाद प्रक्रियेतील भाषेचे स्थान, स्वरूप व कौशल्ये यांचे महत्व स्पष्ट करा.

किंवा

संवाद प्रक्रियेतील विविध अडथळ्यांची चर्चा करा.

*प्रश्न 2)* अर्थ म्हणजे काय? अर्थाच्या प्रकारांची सोदाहरण चर्चा करा.

किंवा

संवाद कौशल्याच्या साहित्यातील सहभागाची सविस्तर चर्चा करा.

*प्रश्न 3)* जीवनाच्या विविध व्यवहारक्षेत्रातील भाषाव्यवहाराचे स्वरूप स्पष्ट करा.

किंवा

साहित्याची भाषा आणि प्रसारमाध्यमांची भाषा यातील भेद लिहा.

*प्रश्न 4)* जनसंपर्कासाठी आवश्यक असलेल्या भाषिक कौशल्यांचा परिचय करून द्या.

किंवा

निबंधलेखनाचे स्वरूप व वैशिष्ट्ये विशद करा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) संवादविषयक सिद्धांन्त

ब) कार्यालयीन मराठी

क) संपादनाची कौशल्ये

ड) जनसंपर्कासाठी भाषिक कौशल्यांचा वापर

## 4) मराठीतील वैचारिक साहित्य आणि साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 100*

*सूचना :*

*1) सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*

*2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* 'वैचारिक साहित्य' ही संकल्पना स्पष्ट करून वैचारिक साहित्याच्या अभ्यासाची आवश्यकता स्पष्ट करा.

किंवा

'गो. ग. आगरकरांचे निबंधलेखन मराठी साहित्याला भूषणावह आहे'. – चर्चा करा.

*प्रश्न 2)* म. फुले, ताराबाई शिंदे आणि मुकुंदराव पाटील यांच्या विचारसूत्रांचा परिचय करून द्या.

किंवा

श्री. म. माटे यांच्या निबंधातील सामाजिक विचारांचा परामर्श घ्या.

*प्रश्न 3)* साहित्याच्या सामाजिक अभ्यासाचे स्वरूप व व्याप्ती लिहा.

किंवा

सामाजिकता व कलामूल्ये यातील संबंध विशद करा.

*प्रश्न 4)* साहित्यपरंपरा आणि समाज या मधील अनुबंध स्पष्ट करा.

किंवा

वाचक आणि साहित्य यांचा परस्पर संबंध उलगडून दाखवा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) विनोबा भावे यांचे धर्म व अध्यात्मविषयक विचार

ब) लोकहितवादींची शतपत्रे

क) सामाजिकता व शैली

ड) न्या. रानडे यांची धर्मविषयक भूमिका

## 5) साहित्य : सर्जन व उपयोजन

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 100*

*सूचना :*

*1) सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*

*2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* साहित्य सर्जन प्रक्रियेसंबंधींच्या मतांचा आढावा घ्या.

किंवा

भरतमुनींचा रससिद्धांत स्पष्ट करा.

*प्रश्न 2)* कादंबरी या साहित्य प्रकाराचे महत्व स्पष्ट करा.

किंवा

प्रेक्षकांचा नाटकाच्या सादरीकरणावर परिणाम होतो काय? कसे ते स्पष्ट करा.

*प्रश्न 3)* कथेतील व्यक्तिरेखा या घटकाचे स्थान स्पष्ट करा.

किंवा

साहित्यनिर्मिती आणि प्रतिभाशक्ती यांचा अनुबंध विशद करा.

*प्रश्न 4)* 'वर्तमानकाळातील सामाजिक घटनांमुळे साहित्यनिर्मितीला चालना मिळते'. कसे ते लिहा.

किंवा

स्वैर निर्मितीचे फायदे – तोटे स्पष्ट करा.

*प्रश्न 5)* खालीलपैकी कोणत्याही दोहोंवर टिपा लिहा.

अ) आत्माविष्कार : साहित्यनिर्मितीचे प्रयोजन

ब) स्फूर्ती : काव्यनिर्माण शक्ती

क) इंटरनेटवरील साहित्य

ड) प्रसारमाध्यमे आणि साहित्यनिर्मिती